






# चला ओळखूया भौमितिक आकृत्या



* चित्रात दाखवल्याप्रमाणे वस्तूंच्या कडांभोवती पेन्सिल फिरवून आकृती काढ व आकृतीच्या बाजूंचे निरीक्षण कर. तयार झालेल्या आकृतीचे नाव वाच.

| | | | |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
|  हा आहे आयत आयताच्या बाजूंची संख्या ४ |  हे आहे वर्तुळ वर्तुळाला एकच वक्र कड आहे, एकही सरळ बाजू नाही. |  हा आहे त्रिकोण त्रिकोणाच्या बाजूंची संख्या ३ |  हा आहे चौरस चौरसाच्या बाजूंची संख्या ४ |

खाली काही गमतीशीर कृती दिल्या आहेत. त्या करून पाहा.

* **कृती १ :** कागदाची एक होडी तयार कर. ती उघडून किती त्रिकोण आणि किती चौकोन तयार झाले, हे मोज. त्यातले कोणतेही दोन त्रिकोण आणि दोन चौकोन रंगव.

* **कृती २ :** काडेपेटीतील काड्यांनी किंवा छोट्या लाकडी पट्ट्यांनी चौकोन, त्रिकोण, तयार कर.

* **कृती ३ :** खेळाच्या कोणकोणत्या साधनांत त्रिकोण, चौकोन, वर्तुळ हे आकार दिसतात, हे शोध.

* **कृती ४ :** त्रिकोण, चौकोन व वर्तुळ या आकारांपासून मजेदार चित्र तयार कर.

**शिक्षक सूचना**

व्यवहारातील विविध वस्तू वापरून आकृत्या काढण्याचा सराव घ्यावा. विद्यार्थ्यांना मुक्तहस्ते आकृत्या काढण्याचा सराव करण्यास सांगावे.

FFLVGK